**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स प्रासोल केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, सर्व्हे नं. १४६, १५०, १५१, १५२, १५४ आणि ७४/३, मुक्काम पोस्ट - ढेकू, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित सिंथेटिक ऑरगॅनिक केमिकल्स युनिटच्या निर्मितीसाठी / उभारणीसाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत.**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स प्रासोल केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, सर्व्हे नं. १४६, १५०, १५१, १५२, १५४ आणि ७४/३, मुक्काम पोस्ट - ढेकू, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित सिंथेटिक ऑरगॅनिक केमिकल्स युनिटच्या निर्मितीसाठी / उभारणीसाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सोमवार, दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी दुपारी ०१.०० वाजता सॅम्युअल हॉल, ४था माळा, जुना मुंबई पुणे हायवे ( एन.एच.-४), खोपोली, जिल्हा-रायगड - ४१०२०३, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. विद्यासागर किल्लेदार, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१ व प्रभारी प्रादेशिक अधिकारी, रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड तथा आयोजक / सदस्य , पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी डॉ. पदमश्री बैनाडे, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. आयुब तांबोळी, तहसीलदार, तालुका - खालापूर, जिल्हा-रायगड, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणीची प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स प्रासोल केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड, सर्व्हे नं. १४६, १५०, १५१, १५२, १५४ आणि ७४/३, मुक्काम पोस्ट - ढेकू, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र, यांचा सर्व्हे नं. १४६, १५०, १५१, १५२, १५४ आणि ७४/३, मुक्काम पोस्ट - ढेकू, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथे प्रस्तावित सिंथेटिक ऑरगॅनिक केमिकल्स युनिटच्या निर्मितीसाठी/उभारणीसाठी प्रकल्पासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रस्तावित प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ अन्वये संवर्ग अ ५ (एफ) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रस्तावित प्रकल्पास भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयास प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी

ऑनलाईन अर्ज दिनांक ०२.०६.२०२० रोजी सादर केला व त्या अर्जास पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी ऑनलाईन प्रणालीव्दारे मंजूरी दिनांक १० जुलै, २०२० रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, रायगड यांनी प्रत्यक्ष (Physical) आणि ऑनलाईन (Virtual) पध्दतीने पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास सोमवार, दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी दुपारी ०१.०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४.०९.२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१.१२.२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-४५/२०२२ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी २२१०१३-एफटीएस-०००५, दिनांक १३.१०.२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, रायगड - **अध्यक्ष**
किंवा त्यांचे प्रतिनिधी
अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा
कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई - **सदस्य**
यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,रायगड

३) उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-१ - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक दैनिक वृत्तपत्र सकाळ, दैनिक कृषिवल या मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस या इंग्रजीत

जनसुनावणीबाबत जाहिर सूचना दिनांक १६.०९.२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर.

२) जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड.

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड.

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड,

५) उप विभागीय अधिकारी, कर्जत, जिल्हा-रायगड

६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती-खालापूर, तालुका-खालापूर,जिल्हा- रायगड.

७) तहसीलदार, तहसील कार्यालय,खालापूर, जिल्हा- रायगड,

८) सरपंच, ग्रुप-ग्रामपंचायत, होनाड, ग्रामपंचायत कार्यालय - आडोशी, अक्तरगाव, टेबेवाडी, ढेकू, साजगाव, सारसन, ठाणेन्हावे, जिल्हा- रायगड.

९) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

१०) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.

११) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय-रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर ११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४.

१२) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

१३) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना /आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. तसेच मा. अध्यक्षांनी प्रवर्तकाचे सादरीकरण सर्व उपस्थितांनी शांततेने एकावे तदनंतर, प्रत्येकाला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली जाईल असे सांगुन प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश दिले.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले. त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (सीएसआर) निधी व कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (सीईआर) निधी याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पास सुमारे ५०.० कोटी खर्च येईल आणि सुमारे १०० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगार प्रकल्पात मिळू शकतो. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसाय व रोजगारात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीका टिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले. पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रकल्पाबाबत आपल्या पर्यावरणविषयक विचार, सूचना वा

आक्षेप आहेत, त्या थोडक्यात मांडाव्यात व सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगावे.

**खालील व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/स्पष्टीकरण/आश्वासनेः**

१) **श्री. सुनंदा रेड्डी, हैद्राबाद, पर्यावरणवादीः-**

मी प्रकल्पास शुभेच्छा दिल्या. मी भारतातील पहिला पर्यावरणवादी आहे की जो औद्योगिकरणास पाठिंबा देतो. कारण माझ्या मते देशात बेकारी हेच मोठे प्रदूषण आहे. केंद्र सरकार व सर्व राज्ये दरवर्षी ५-६ लाख रोजगार देतात. मात्र भारतात सुमारे एक कोटी विद्यार्थी हे नोकरीसाठी तयार होत आहेत. ९५ लाख लोक हे खाजगी व सरकारी उद्योगात समाविष्ट होऊ शकतात. त्यांना विविध उद्योगातच रोजगार मिळू शकतो. म्हणून मी औद्योगिकीकरणास पाठिंबा देत आहे.

श्री. रेड्डी यांनी सूचना केली की हरितपट्टा विकसित करताना औषधी वनस्पती व फळझाडे यांची लागवड करण्यात यावी, ज्याचा समाजास फायदा होईल. प्रकल्पात पावसाचे पाणी संवर्धन योजना (Rain Water Harvesting) व पाणी साठवण (Water Storage) राबविण्यात यावे. प्रकल्पात स्थानिकांना रोजगाराची संधी देणार हे चांगले आहे. मात्र कंपनी प्रशासनास विनंती आहे की स्थानिक तरुण तरुणींसाठी कौशल्य विकास कार्यक्रम हाती घेण्यात यावा. जेणेकरुन त्यांना आपल्या व इतर प्रकल्पातही रोजगाराची संधी मिळू शकते.

श्री. रेड्डी यांनी सूचना केली की प्रकल्प प्रवर्तकांनी ग्रामस्थांबरोबर एक समन्वयक समिती स्थापन करावी. त्यामध्ये राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचा एक प्रतिनिधी, स्थानिक शासकीय अधिकारी असावेत आणि गावातील मागणी केंद्रीत कामे हि, परिसरातील समितीच्या सल्ल्यानूसार करण्यात यावीत तसेच त्यांनी सांगितले की, पर्यावरण

सल्लागाराने तपशीलवार अहवाल (Detailed Report) तयार केलेला आहे त्याबद्दल पर्यावरण सल्लागाराचे अभिनंदन. शेवटी श्री. रेड्डी यांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयास प्रासोल केमिकल्स लिमिटेड यांना पर्यावरण अनुमती प्रदान करण्याची विनंती केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी श्री. रेड्डी यांचे आभार मानताना सांगितले की त्यांनी केलेल्या सूचनांबाबत कंपनी प्रशासन निश्चितच सकारात्मक निर्णय घेईल.

**२) <u>श्री. संतोष पाटील, राहणार-आत्करगाव. तालुका- खालापूर, जिल्हा-रायगडः-</u>**

आता येणारा प्रासोल कंपनीचा प्रकल्प हा सर्व्हे नं. १४६, १५०,१५१, १५२, १५४ आणि ७४/३ येथे उभारणार असून या चांगल्या प्रकल्पाचे स्वागत करु या. प्रासोल कंपनीचे वैशिष्ट्ये हे आहे की येथील कार्यरत प्रकल्पात कामगार हे स्थानिक आहेत, व्यवस्थापन हे स्थानिक असून मराठी आहे. तसेच नवीन प्रकल्पात स्थानिकांना रोजगार देण्यात यावा ही विनंती. प्रकल्पास शुभेच्छा.

प्रकल्प अधिकारी यांनी श्री. संतोष पाटील यांना धन्यवाद देताना सांगितले की प्रकल्पात नेहमीच स्थानिकांनाच रोजगाराची संधी देण्यात येते.

**३) <u>श्री. नरेन्द्र चंद्रकांत गायकवाड, राहणार-आत्करगाव,तालुका खालापूर, जिल्हा-रायगडः-</u>**

या नवीन प्रासोल केमिकल्सच्या पर्यावरणविषयक जनसुनावणीस उपस्थित राहिलेल्या सर्वांना धन्यवाद. प्रासोल केमिकल प्रायव्हेट कंपनीची या अगोदर एक जनसुनावणी झाली. मागील जनसुनावणी ही कार्यरत प्रकल्पाची होनाड ग्रामपंचायत हद्दीत होती. आताची जनसुनावणी ही ढेकू ग्रामपंचायत हद्दीत नवीन प्रकल्पासाठी आहे. या नवीन प्रकल्पाची जनसुनावणी होत असताना मागील पार्श्वभूमी सांगणे इष्ट होईल. मागील जनसुनावणीत काही मुद्दे उपस्थित केलेले होते. येथील प्रदूषणामुळे स्थानिकांना जो त्रास होतो, तो मांडण्यात आलेला होता. आम्ही कंपनीस धन्यवाद देतो की त्यांनी

त्याबाबत उपाययोजना केल्या. येथे प्रवास करताना जो वासाचा त्रास होता, तो ब-याचअंशी कमी झालेला आहे. दुचाकी वाहनावरुन जाताना किंवा चालताना जे धुळीचे कण जात होते, तो त्रास कमी झालेला आहे. जलप्रदूषणाचे प्रमाण कमी झालेले आहे.

श्री. गायकवाड यांनी सांगितले नदीला ब-याच वेळा काळे पाणी येते. ते कोठून येते, त्याबाबत पुढील कारवाई करण्यात यावी. हा नवीन प्रकल्प जुन्या प्रकल्पापासून थोड्या अंतरावर बाजूला आहे. ग्रामस्थांसाठी जमेची बाजू आहे की त्या कारखान्याला लागून नदी नाही. त्यामुळे या नवीन कारखान्यामुळे पाण्याचे, नदीचे प्रदूषण होईल असे वाटत नाही. परंतु पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना पारित केलेल्या निकषांनुसार झिरो लिक्विड डिस्चार्ज/शून्य द्रव निकसन प्रकल्प हा १००% असलाच पाहिजे. जेणेकरुन जलप्रदूषण व जमिनीतून कुठलेही रसायन जाऊन जमिन व पाणी खराब होणार नाही.

श्री. गायकवाड यांनी सांगितले की प्रकल्पाचे स्वागत करताना कारखान्यानेही आपली जी जबाबदारी आहे, ती पार पाडावीत म्हणजे स्थानिकांना रोजगार देणे, स्थानिक कंत्राटदारांना कामे देणे, प्रदूषण नियंत्रणाचे नियम काटेकोरपणे पाळणे केल्यास अशा प्रकल्पांना पाठिंबा व सहकार्य असते. मी या प्रकल्पाचे ढेकू गावात स्वागत करतो, मात्र कंपनीकडून कोठलेही जल, हवा, घातक घनकचरा, इ. चे प्रदूषण होता कामा नये, याची खबरदारी घेण्यात यावी. या कंपनीची भरभराहट होवो ही प्रार्थना.

प्रकल्प अधिकारी यांनी श्री. गायकवाड यांच्या केलेल्या सूचनांनुसार येणा-या प्रकल्पात प्रदूषण नियंत्रणाचे सर्व नियम पाळण्यात येतील, स्थानिकांनात रोजगाराची संधी, कंत्राटीचे काम हे स्थानिक कंत्राटदारांना देण्यात येईल असे आश्वासन दिले.

४) **श्री. संदेश पाटील, राहणार- तांबाटी, तालुका खालापूर, जिल्हा-रायगडः-** पाताळगंगा नदी प्रदूषण नियंत्रण व संवर्धन या एनजीओ अध्यक्ष यांनी सांगितले की येणारा

उद्योग हा ढेकू परिसरासाठी, तालुक्याच्या विकासासाठी चांगला आहे. कुशल, अर्धकुशल, अकुशल स्थानिकांना प्रकल्पात सामावून घेण्यात यावे. आपला प्रकल्प हा नदीपात्रापासून ५० मीटर अंतराच्या आत आहे. तर आपण प्रदूषण नियंत्रणासाठी काय उपाययोजना करणार याबाबत बैठकीत माहिती द्यावी. आपल्या प्रकल्पाची भरभराहट व्हावी ही प्रार्थना.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रस्तावित प्रकल्पात घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी घरगुती सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (एसटीपी) तर औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी औदयोगिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (ईटीपी) कार्यान्वित करण्यात येणार आहे. उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न झालेले सांडपाण्यावर प्रक्रिया त्याचा प्रकल्पात पुनर्वापर करण्यात येणार आहे. प्रकल्पातून पाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेरील जागेत सोडणार नाही. सदरहू प्रकल्प हा झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असेल. त्यावेळी श्री. संदेश पाटील यांनी १०-१५% लिक्विडेशन राहिल असे मत मांडले. त्यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की प्रकल्पात - मल्टी इफेक्टीव्ह इव्हॅपोरेटर (एमईई) ही सयंत्रणा कार्यान्वित करणार आहोत. श्री संदेश पाटील यांनी झिरो लिक्विड डिस्चार्ज होत नाही, पण त्यासाठी प्रयत्न करण्यात यावा असे मत मांडले व रोजगारात स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे ही सूचना केली.

**५) श्री. समीर देशमुख, राहणार-आडोशी, सदस्य, ग्रुप ग्रामपंचायत-आत्करगाव, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

प्रासोल कंपनीच्या मालकांचे स्वागत की त्यांनी दुसराही प्रकल्प या भागात आणलेला आहे. गुंतवणुकदार हा कोठेही गुंतवणूक करु शकतो. पण त्यांनी येथेच गुंतवणुक करुन येथील तरुण-तरुणींना रोजगाराची संधी दिली व स्थानिक व्यावसायिक, कंत्राटदार यांनाही व्यवसायाची संधी दिली याबद्दल त्यांचे आभार. येथे सर्वांनीच सांगितले की प्रासोल कंपनीत स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येते.आम्हांला त्याबाबत शंका नाही.

येणारा प्रकल्प हा एक नवीन उमेद घेऊन आलेला असेल. या परिसरात सुशिक्षित बेरोजगार आहेत, त्यांना या प्रकल्पामुळे नवीन संधी निर्माण होईल. प्रकल्पास शुभेच्छा.

प्रकल्प प्रवर्तक यांनी श्री देशमुख यांचे आभार मानले.

६) **श्री. रामचंद्र नामदेव देशमुख, राहणार-साजगाव, तालुका खालापूर जिल्हा - रायगडः-**

आजचा दिवस महत्वाचा आहे. अगोदरचा प्रकल्प हा होनाड ग्रामपंचायतीमध्ये आहे, तर नवीन प्रकल्प हा साजगाव ग्रामपंचायती हद्दीत आहे. केवळ एक सीमा आहे, एवढाच फरक आहे. या प्रकल्प उभारणीस आमची हरकत नाही. माझ्याबरोबरच इतरहीजण या प्रकल्पास होकार देतील याचे एकमेव कारण म्हणजे कंपनीच्या मालकांची प्रत्येक माणसाला न्याय देण्याची प्रवृत्ती आहे. प्रासोल कंपनी हे कुटुंबच आहे, अशाप्रकारे कंपनीचे मालक वागत असतात. येथील लोकांच्या शुभकार्यात ते शक्य तेवढा भाग घेतात. त्यामुळे त्यांचा समाजाला फायदाच होतो.

श्री. देशमुख यांनी पुढे मत व्यक्त केले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेले निर्देश पाळण्यात यावेत. कंपनी प्रशासनाची कोणत्याही व्यक्तीने सांगितेल्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्याचा ही कंपनी दरवेळी प्रयत्न करत असते. तरी हा कारखाना येथे येऊन कारखान्याची भरभराहट होवो ही प्रार्थना.

प्रकल्प प्रवर्तकांनी श्री. देशमुख यांचे आभार मानून सांगितले की प्रासूल कंपनी ही नक्कीच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेली मानके पाळेल. त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करेल.

७) **श्री. संदीप तातुराम पाटील, राहणार-आत्करगाव,तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

प्रकल्पाचे स्वागत करतो. कारण या प्रकल्पात २५०-२०० लोकांना रोजगार मिळणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे सर्व ग्रामस्थांतर्फे स्वागत. पुढे त्यांनी सूचना केली

की बैठकीत उपस्थितांनी केलेल्या सूचनांची अंमलबजावणी ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने करावी ही विनंती. या प्रकल्पास मान्यता द्यावी ही विनंती.

प्रकल्प प्रवर्तक यांनी धन्यवाद देताना आश्वासन दिले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्यात येईल.

**८) श्री. प्रकाश विठ्ठल पाटील, राहणार-चिंचवळी गोहे,तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

सदस्य, ग्रुप ग्रामपंचायत-होनाड, तालुका- खालापूर, जिल्हा-रायगड त्यांनी सांगितले की गेल्यावेळी कार्यरत प्रकल्पात विस्तारिकरणासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी झालेली होती.त्यावेळी काहींनी पाठिंबा दिला, काहींनी बरेच मुद्दे उपस्थित केलेले होते. बैठकीत सांगितल्याप्रमाणे कंपनीने त्यानंतर ब-याच सुधारणा केलेल्या आहेत. हा औद्योगिक विभाग आहे. बरेच कारखाने आले व ५-६ वर्षांत बंद झाले. मात्र हा एकमेव कारखाना आहे की तो टिकून आहे. नवीन प्रकल्प उभारणीमुळे स्थानिकांना रोजगाराची संधी मिळणार आहे. तरी या प्रकल्पाचे स्वागत करतो. मात्र शासनाच्या आवश्यक असणा-या सर्व परवानग्या घेऊनच कारखाना चालू करण्यात यावा. प्रकल्पास शुभेच्छा.

पर्यावरण अधिकारी यांना धन्यवाद आश्वासन दिले की सर्व शासकीय मानंकाप्रमाणेच प्रकल्प कार्यान्वित ठेवण्यात येईल.

**९) श्री. नीतीन दत्तात्रय तवळे, राहणार-आत्करगाव,तालुका खालापूर जिल्हा-रायगडः-**

साजगाव ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत प्रासोल केमिकल्सचा नवीन कारखाना उभारणीबाबत ही पर्यावरणविषयक जनसुनावणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी आयोजित केलेली आहे. सादरीकरणात जी कारखान्याची माहिती दिली, ती सर्वांना ऐकली आहे. कारखान्यास आमचा विरोध नाही. कारखाना यावा, पण तेथील भूमीपुत्रांनाच

रोजगार मिळाला पाहिजे. प्रासोल कंपनीत स्थानिक मराठी आहेत, पण भूमीपुत्र कमी आहेत. होनाड ग्रामपंचायत, आत्कर ग्रामपंचायत, ढेकू - साजगाव ग्रामपंचायत हद्दीतील भूमीपुत्र तरुण तरुणींना जास्तीतजास्त रोजगार उपलब्ध करुन द्यावा अशी आमची मागणी आहे. तसेच व्यवसाय जास्तीत जास्त भूमीपुत्रांना देता येईल याबाबत लक्ष देण्यात यावे. प्रदूषण कमी कसे होईल याकडे लक्ष देण्यात यावे. कंपनीला पाठिंबा आहे, पण इतर काही लोकांचें, भूमीपुत्रांचे प्रश्न असतील, तर ते सोडविण्यात यावेत.

प्रकल्प प्रवर्तकांनी श्री नीतीन तवळे यांनी शुभेच्छा व्यक्त करताना माहिती दिली की त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा निश्चतच फायदा होईल. प्रकल्पात रोजगाराची संधी देताना स्थानिकांनाच रोजगार देण्यात येत आहे, तेच धोरण नवीन प्रकल्पात राबविण्यात येईल.

येथे अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की त्यांची एक सूचना आहे की संबंधित व्यक्तीने जास्तीतजास्त ग्रामपंचायत हद्दीतील भूमीपुत्रांना रोजगाराची मागणी केलेली आहे. तर प्रकल्प प्रशासनाने प्रकल्पात भरती सुरु करण्याअगोदर ग्रामपंचायतीस पत्र पाठवावे की कोणत्या पदांवर कोणती शैक्षणिक अहर्ता, अनुभव असणारी व्यक्ती हवी, याची माहिती मागविण्यात यावी. जे विद्यार्थी-विद्यार्थिनी मिळतील, ते नुकतेच पास-आऊट झालेले असतील. संबंधित संभाव्य उमेदवारांना प्रकल्पातर्फे प्रशिक्षण देण्यात यावे. यामध्ये एक सकारात्मक मुद्दा होतो की जी ऊर्जा नुकतेच पास-आऊट झाल्यांकडे असते, ती अनुभवी व्यक्तींपेक्षा जास्त असते. तर त्यांनी प्रशिक्षण देऊन प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात यावी. तुम्हाला प्रयत्न करुन अपेक्षित उमेदवार (भूमीपुत्र-तरुण, तरुणी) नाही मिळाले तर आजूबाजूच्या ग्रामपंयातींशी संपर्क साधावा. तिथेही नाही मिळाले, तर रायगड जिल्ह्यातील इतर तालुक्यात प्रयत्न करण्यात

यावा. तिथेही नाही मिळाले तर महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्ह्यातून लोक घ्या, तिथेही नाही मिळाले तर भारतातील कुठलेही लोक घ्या.

प्रकल्प प्रवर्तक यांनी अध्यक्षांना अभिवचन दिले की आता बैठकीत अध्यक्षांनी सांगितलेल्या सूचना प्रकल्पात भरतीच्या वेळी पाळण्यात येतील.

**१०) <u>श्री. नरेश पाटील, राहणार-ढेकू, तालुका--खालापूर, जिल्हा-रायगड माजी सभापती, जिल्हा परिषद-रायगड-</u>**

मा. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती व इतर सर्व अधिकाऱ्यांचे जनसुनावणीस आल्याबददल व स्थानिकांच्या सुचना ऐकून घेतल्याबाबत स्वागत केले. त्याचप्रमाणे प्रासोल कंपनीच्या नवीन प्रकल्पासाठी शुभेच्छा देण्यात येत आहे. नवीन कारखाना परिसरातील लोकांना रोजगाराची संधी देईलच. त्याचप्रमाणे स्थानिक व्यवसायिकांना व्यवसायाची संधी नवीन प्रकल्पात मिळेल.

त्यांनी पुढे सांगितले की या प्रासोल कंपनीने एक कोटी रुपये खर्च करुन येथे शाळा बांधून दिलेली आहे. शिक्षण महत्वाचे असूनही त्यास खर्च करणारे कमी मिळतात. कंपनीच्या मालकांनी या विभागासाठी फार मोठी संधी उपलब्ध करुन दिलेली आहे. सीएसआर निधीतून या विभागात वेगवेगळे उपक्रम राबवत असतात. त्यामुळे या कारखान्याला कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही. या प्रकल्पाचा त्रास न होता फायदा कसा होईल, याची काळजी प्रकल्प प्रवर्तक घेतच असतात.

ते पुढे म्हणाले की मा. अध्यक्षा यांनी केलेली सूचना हि अत्यंत रास्त असून नुकतेच पास-आऊट झालेल्या तरुणांना प्रशिक्षण देऊन प्रकल्पात नोकरीची संधी द्यावी. या सूचनेचे पालन प्रकल्प प्रवर्तकांनी करावे. तरी येणा-या प्रकल्पाचे स्वागत करुन शुभेच्छा देतो.

प्रकल्प प्रवर्तक यांनी श्री नरेश पाटील यांना धन्यवाद दिले.

**११) श्री. निलेश गणपत पाटील, राहणार-ढेकू, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड**

प्रथम प्रासोल कंपनी व त्याचेव्यवस्थापकीय संचालक यांचे अभिनंदन आणि स्वागत. प्रासोल कंपनीने शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रासाठी चांगली मदत केलेली आहे. याबाबत कोणतेही दुमत नाही.

मात्र येथे सूचक विधान करायचे आहे की आज रोजी ढेकू गावातील लहान कंपन्यांचा ढेकू गावात खूपच त्रास होत आहे. तरी प्रासोल केमिकल्स याची दखल घेऊन चांगल्याप्रकारे काम करतील याबाबत दुमत नाही.

त्यांनी पुढे सांगितले की आज रोजी रोजगाराबाबत बोलायचे, तर कंपनी रोजगार देते. येथील कामगार सांगतात की येथील पेमेंट स्केल हे खूपच कमी आहे. जर स्थानिक येथील कंपन्यांतील प्रदूषण सहन करतात, तर कंपनी व्यवस्थापनाने कामगारांच्या पगाराबाबत बघावे. प्रदूषणामुळे गावातील लोकांना त्रास होणार. तर कंपनीत पेमेंट खूपच कमी आहे. त्याबाबत लक्ष कंपनी प्रशासनाने घालावे. महागाई खूपच वाढलेली आहे. त्यासाठी पगार वाढ हे कंपनी व्यवस्थापनाने लक्षात ठेवावे. बाकी कंपनी व्यवस्थापन खूपच चांगले काम करते. तरी स्थानिकांच्या गरजा लक्षात घेऊन पगार वाढविण्यात यावा.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रासोल केमिकल्स हया कंपनीत किमान वेतन कायदा पाळला जातो व नियमाप्रमाणे वेतन दिले जाते. आपल्या सूचनांचा निश्चितच विचार करण्यात येईल.

**१२) श्री. भरत पाटील, चिंचवळी गोहे, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

मी चिंचवळी गोहे येथील रहिवाशी आहे. मी स्वतः प्रासोल केमिकल्समध्ये एक कामगार म्हणून काम करत होतो. कंपनीतील व्यवस्थापन हे पूर्णपणे स्थानिक असल्याने त्यांना फोन करुन अडचण सांगितली उदा- कंपनीतून धूर येत आहे, तर त्यावर त्वरित उपाय होतो. प्रदूषण नियंत्रणासाठी कंपनीने बरेच प्रयत्न करुन प्रदूषण हे कमी केलेले

आहे. मी ज्या कंपनीत काम करत होतो, त्या कंपनीच्या सहकार्याने मी कंपनीचा एक व्यावसायिक आहे. कंपनीने स्थानिकांना रोजगार दिलेले आहेत, त्याचप्रमाणे चांगले व्यावसायिक सुध्दा निर्माण केलेले आहेत. तरी मी या नवीन कंपनीचे सहर्ष स्वागत करत आहे.

कंपनी प्रशासनाने आभार मानले.

१३) **<u>श्री. हेमंत गणपत पाटील, चिंचवळी गोहे, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-</u>**

आमच्यी ग्रुप ग्रामपंचायत-होनाडमध्ये प्रासोल केमिकल्स सुमारे १९९९ पासून कार्यरत आहे. ती जशी आमच्या होनाड ग्रामपंचायतेत जशी सहकार्य करते, तसेच त्यांनी ढेकू गावातही सहकार्य करावे. वेळोवेळी मालकांचे सहकार्य लाभते. तसेच लोकांना ३० ते ६०% व्यवसाय करुन देत आहे, ते १००% व्यवसाय जाईल याबाबत लक्ष घालावे.

प्रकल्प प्रवर्तकांनी धन्यवाद देताना सांगितले की नवीन प्रकल्पात केलेल्या सूचनांचे पालन करेल.

१४) **<u>श्री. सुरज सुरेश पाटील, राहणार-ढेकू, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-</u>**

मी ढेकू ग्रामपंचायत ह्द्दीत येणा-या कंपनीचे समर्थन करतो. माझा छोटासा मुद्दा आहे. कंपनीने रोजगार निर्मितीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. तर मी कंपनीस एक सूचना करु इच्छितो की रोजगार भरती किंवा कंपनीत रोजगार लागण्यासाठी जे कामगार, कर्मचारी लागतील, त्यासाठी कोणत्याही पक्षाच्या प्रतिनिधीची मदत, वशिला न घेता नोकरी मिळावी. तसेच सर्वसामान्य लोकांचा व्यवसाय कंपनीने घ्यावा ही माझी इच्छा आहे. कारण कंपनीत रोजगारासाठी कुठल्यातरी नेत्याचे, पक्षाचे नांव सांगावे लागते. त्यानंतर कंपनीत रोजगार मिळतो. असे न करता कंपनीने त्या माणसाची पात्रता पाहून त्या माणसाची नोंद घ्यावी, एवढेच मी सांगू इच्छितो.

प्रकल्प प्रवर्तकांनी श्री सुरज पाटील यांचे आभार मानताना सांगितले की प्रकल्पात नोकरीची संधी देताना शैक्षणिक पात्रता व तत्सम अनुभव पाहूनच दिली जाते व त्याप्रमाणे भविष्यातही शैक्षणिक पात्रता व तत्सम अनुभव पाहूनच रोजगार दिला जाईल.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे मत मांडले की हा खूपच चांगला मुद्दा मांडलेला आहे. कुठलीही शिफारस न घेता फक्त पात्रतेनुसार नोक-या द्याव्यात. पात्रतेनुसार नोकरी मिळविणा-यास सर्व राजकीय पक्षांचा पाठिंबा राहणारच आहे. उपस्थित व्यक्तीला तसा अनुभव येत असेल, म्हणून त्यांनी येथे मत मांडले आहे. तरी प्रकल्पात पात्रतेनुसारच नोक-या देण्यात याव्यात.

प्रकल्पाचे अधिकारी यांनी सूचनांचे पालन करण्याचे आश्वासन दिले.

**१५) श्री. रमेश गणु पाटील, राहणार-ढेकू, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

त्यांनी सांगितले की मी प्रासोल केमिकल्स कंपनीचे स्वागत करतो. त्यांनी मत मांडले की प्रत्येक वेळी बघितले की दरवेळी विरोध करण्यात येतो. पण आज येथील स्थानिक नागरिकांनी या प्रकल्पासाठी जे सहकार्य केलेले आहे, त्याबद्दल मी त्यांचा ॠणी आहे. मनातील शंका प्रत्येकाने काढून टाकावी की तसेच कंपनी प्रशासनाने कुठल्याही मोठ्या राजकीय पक्षाच्या व्यक्तीच्या माणसास काम न देता पात्रतेनुसार प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात यावी. मी ढेकू गावात कंपनीच्या कार्यकारी संचालकांचे स्वागत करतो.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की आपण जे सूचित केले, त्याचप्रमाणे अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी या मुद्द्यावर जे सूचित केलेले आहे, त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

१६) **श्री. मनिष वामन खवळे, राहणार-ढेकू, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-**

श्री. खवळे म्हणाले की विरोधाला विरोध करुन काहीही उपयोग नाही. मागचा अनुभव लक्षात घेऊन प्रासोल केमिकल्सने एक सकारात्मक सादरीकरण केलेले आहे.

त्यांनी या ग्रामपंचायतीस प्रकल्प उभारणीचा जो निर्णय घेतला, त्याचे स्वागतच केलेले आहे. तरी उपस्थितांनी बैठकीत केलेल्या सूचनांचे पालन व्हावे. वृक्षारोपण लावण्याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी श्री खवळे यांना धन्यवाद देताना सांगितले की हरितपट्टा विकसनबाबत करण्यात आलेल्या सूचनांचे पालन केले जाईल.

**१७) <u>श्री. विशाल अशोक पाटील, राहणार-ढेकू,तालुका-खालापूर, जिल्हा-रायगडः-</u>**

येथे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रासोल कंपनीच्या नवीन प्रकल्प उभारणीसाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित केलेली आहे. प्रासोल कंपनीचे स्वागत. त्यांनी पुढे सांगितले की मी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आणू इच्छितो की कंपनीने जो अहवाल दिलेला आहे, त्यात असे नमुद केलेले आहे की हरितपट्टा क्षेत्र हे ३३% ठेवण्यात येईल. कार्यरत प्रकल्पात हा नियम पाळला जात नाही. कार्यरत प्रकल्पात रस्ता व खुले क्षेत्र यात २३.९% दिलेले आहे. तर सध्या जो प्रकल्प चालू आहे, त्यात ते निदर्शनास येत नाही. त्याचे फोटोही काढलेले आहेत. त्यांच्या गेट नं. १ येथे मोकळा रस्ता होता. त्यावर त्यांनी शेड टाकलेले आहे. त्यात ड्रम्स ठेवलेले आहेत. जर तेथे अपघाताने आग लागली, तर कंपनीच्या कामगारांना तेथून ये-जा करता येणार नाही. कंपनीत मोठी हानी होऊ शकते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशास आणू इच्छितो की त्यांनी नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

प्रकल्प अधिकारी यांनी कार्यरत प्रकल्पात व नवीन प्रकल्पात पारित केलेले निर्देश पाळण्याचे आवाहन केले.

श्री. किल्लेदार, प्रभारी प्रादेशिक अधिकारी यांनी सांगितले की कार्यरत प्रकल्प हा सर्व्हे नं. ८,१३,१५,१६, २५ आणि ७५, होनाड येथे आहे. उपस्थित करण्यात आलेला

मुद्दा हा बरोबर आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वेळोवेळी प्रदूषण नियमांचे पालन होते की नाही याची पाहणी करण्यात येते. आताचा सर्व्हे नं. ७५ हा त्यांनी हरितपट्टयासाठी राखीव ठेवलेला आहे. कारखान्यात जागा नाही, म्हणून त्यांनी कारखान्याच्या मागे असलेल्या भूखंडावर ३३% हरितपट्टा विकसित केलेला आहे.

सदस्य आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की नवीन प्रकल्प हा सर्व्हे नं. १४६,१५०,१५१,१५२,१५४ येथे उभारण्यात येणार असून सर्व्हे नं. ७४/३ हा फक्त हरितपट्ट्यासाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. ३३% हरितपट्टा विकसित करण्याचे पालन केल्याशिवाय केंद्र शासन पर्यावरण अनुमती (Environment Clearance) कोणत्याही प्रकल्पास मिळतच नाही. नवीन प्रकल्पात त्यांनी वेगळा भूखंड - सर्व्हे नं. ७४/३ अधिग्रहित केलेला आहे,त्यावर हरित पट्टा विकसित करण्यात येणार आहे.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले बैठकीत ब-याचजणांनी प्रश्न, शंका, विचारल्या,सूचना केल्या व आक्षेपही नोंदविलेले आहेत. उपस्थित केलेल्या शंका, आक्षेप यांचे चांगल्याप्रकारे निरसन प्रकल्प प्रवर्तक यांनी केलेले आहे.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाबाबत काही प्रश्न उपस्थित करण्यात आले. आज जो नवीन प्रकल्प उभारणीसाठी सादरीकरण करण्यात आले, तो नवीन प्रकल्प झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असेल. उत्पादन प्रक्रियेत जे औदयोगिक सांडपाणी निर्माण होईल, त्यावर प्रक्रिया करुन याच प्रकल्पातच १००% पुनर्वापर करण्यात येणार आहे.

याबाबत एका उपस्थितांनी प्रश्न विचारला की सांडपाण्यातही Wastage - अपव्यय निघते. बरोबर आहे. ज्यावेळी प्राथमिक, व्दितीय, तृतीय प्रक्रिया केली जाते, त्यानंतर त्या

पाण्यावर आर.ओ.(Reverse Osmosis) प्रकल्प कार्यान्वित करुन ते शुध्द करण्यात येते. त्यातील ७०% पाण्याचा पुनर्वापर करण्यात येणार आहे. जे ३०% Wastage - अपव्यय राहिल, त्यासाठी Multi Effective Evaporator (MEE) सयंत्रणा असते, म्हणजे MEE आणि ATFD हे जे ३०% Wastage - अपव्यय आहे, ते जाळण्यात येते. तेथे हवा प्रदूषण होऊ नये म्हणून स्क्रबिंग व बॅग फिल्टर ही सयंत्रणा बसविली जाते.कुठल्याही प्रकारचे सांडपाणी हे प्रकल्पाबाहेर जाणार नाही अशी सयंत्रणा प्रकल्पात कार्यान्वित करण्याचे कबूल केलेले आहे आणि जोपर्यंत ती सयंत्रणा प्रकल्पात बसविली जात नाही, तोपर्यंत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्रकल्पास प्रकल्प कार्यान्वित करण्याची परवानगी [(Consent to Operate - (C to O)] दिली जात नाही.

सदस्य, आयोजक यांनी सांगितले की जोपर्यंत प्रकल्प शून्य द्रव निकसन (Zero Liquid Discharge - ZLD) सयंत्रणा कार्यान्वित करत नाही, तोपर्यंत प्रकल्पास परवानगी देण्यात येणार नाही. त्यांनी पुढे सांगितले प्रकल्प प्रवर्तकांनी नवीन प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापन योजनेसाठी (Environment Management Plan-EMP) रुपये ५/- कोटींची तरुतुद केलेली आहे. त्याचप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकांनी रुपये १/- कोटी (रुपये एक कोटी) ची तरतुद ही Corporate Environment Responsibility (CER) Fund सीईआर निधीसाठी केलेली आहे. प्रकल्प परिसरातील आजूबाजूंच्या गावात पर्यावरण संवर्धन योजनांसाठी तो वापरणे बंधनकारक आहे. गावाला शुध्द पाणी पुरवठा, वृक्ष संवर्धन यांसाठी तो वापरता येतो.

सदस्य, आयोजक यांनी ग्वाही दिली की जोपर्यंत जोपर्यंत प्रकल्प शून्य द्रव निःस्सारण (Zero Liquid Discharge - ZLD) सयंत्रणा कार्यान्वित करत नाही, तोपर्यंत प्रकल्पास परवानगी देण्यात येणार नाही.

**ऑन लाईन उपस्थितांबरोबर प्रश्न आणि उत्तरे: –**

१) **श्री. हृषिकेश पाटील:-**

ऑनलाईन बैठकीस असणारे यांनी विचारणा केली की स्थानिक म्हणजे नक्की कोण? स्थानीक म्हणून समजण्यासाठी प्रकल्पापासून किती कि.मी. अंतर असावे?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की स्थानिक म्हणजे प्रकल्प स्थानापासून १० कि.मी. परिघाच्या आत जे राहतात, त्यांना स्थानिक समजून रोजगारात संधी प्राधान्याने देण्यात येईल. त्यावेळी उपस्थितांनी ठेकेदारीबाबत प्रकल्प स्थानापासून किती कि.मी. स्थानिक म्हणून समजण्यात येईल. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की कार्यरत प्रकल्पात ८०-९०% लोक हे स्थानिक आहेत.

प्रकल्प प्रवर्तकांनी उपस्थितास आवाहन केले की पर्यावरण विषयक प्रश्न विचारण्यात यावेत. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती आयोजित केलेली असून पर्यावरणविषयक प्रश्न विचारण्यात यावेत.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रत्यक्ष जनसुनावणी हॉलमधून ऑनलाईन असणा-या व्यक्तीस आश्वासन दिले की आपण केलेल्या सूचनांनुसार नवीन प्रकल्पात स्थानिकांना कंत्राटी व रोजगाराची संधी देण्यात प्राधान्य देण्यात येईल.

**श्री. मोहन पाटील, गाव- चिंचवळी गोहे, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड:- (मोबाईल नं. ९८२३७८२६८१)**

हा चांगला प्रकल्प आहे. मी कित्येक वर्षे पाहत आहे. पर्यावरणाची काळजी चांगल्याप्रकारे करत आहेत. सादरीकरण मी पाहिले आहे. सर्व मुद्दे चांगले मांडलेले आहेत. त्यांनी सूचना केली की प्रकल्पाकडील सीएसआर निधी गावाच्या विकासासाठी खर्च केल्यास चांगले होईल.

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रस्तावित नवीन प्रकल्पात सीएसआर निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. सादरीकरणात ती वाचून दाखविलेली आहे. ती टप्याटप्याने करण्यात येईल.

श्री मोहन पाटील यांनी कंपनीचे आभार मानले की गावातील लोकांना रोजगार दिलेला आहे. कंपनीचे सहकार्य हे वेळोवेळी आम्हा गावक-यांना मिळते.

**ऑनलाईन बैठकीत दोन व्यक्तींनी प्रश्न विचारले. कोणी उपस्थित नसल्याने ऑनलाईन संपर्क बंद करण्याचे आदेश अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दिला.**

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी यांनी बैठकीचा समारोप करताना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था, पोलिस प्रशासन व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे आभार मानले.

सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की मा. अध्यक्षा यांनी सूचित केल्याप्रमाणे सर्व सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी याची नोंद घेण्यात आलेली आहे. त्याचा इतिवृतात समावेश करुन ते इतिवृत अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त लेखी सूचना/आक्षेप यांच्याबरोबर पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. तेथील तांत्रिक समिती स्थानिकांनी उपस्थित केलेल्या सर्व सूचनांचा विचार करणार आहे. या प्रकल्पास मान्यता देणे किंवा न देणे याबाबत समिती पुढील निर्णय घेत असते. सदस्य, आयोजक यांनी सर्व उपस्थितांचे जनसुनावणीस राहून आपली मते, सूचना, आक्षेप नोंदविले याबद्दल आभार व्यक्त करुन मा. अध्यक्ष याच्या वतीने जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

सोबत २ प्राप्त झालेले लेखी सूचना / आक्षेप जोडण्यात आलेले आहेत.

**(विदयासागर किल्लेदार)**
सदस्य / आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड

**(डॉ. पद्मश्री बैनाडे)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा- रायगड